# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक २६८ वा रविवार दि.२० एप्रिल २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा-केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले

### सामाजिक न्याय विभागाच्या योजनांचा आढावा

लातूर :- केंद्र आणि राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवावा. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचना केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दिल्या. लातूर येथील नवीन शासकीय विश्रामगृहाच्या सभागृहात आयोजित विविध योजनांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, लातूर शहर महानगरपालिकेचे प्रभारी आयुक्त देविदास जाधव, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक प्रमोद शिंदे आणि तहसीलदार सौदागर तांदळे उपस्थित होते. सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. तसेच, मुला-मुलींसाठी शासकीय



वसतिगृहांची सुविधा उपलब्ध आहे. या योजनांचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना मिळावा, यासाठी समाज कल्याण विभागाने विशेष प्रयत्न करावेत. कोणताही पात्र विद्यार्थी यापासून वंचित राहू नये. वसतिगृहात चांगल्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे श्री. आठवले यांनी सांगितले. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यांचा आढावाही त्यांनी घेतला. या गुन्ह्यांतील पीडितांना शासकीय नियमानुसार तातडीने सहाय्य करावे आणि तपास जलद गतीने पूर्ण करावा, असे निर्देश दिले. दिव्यांग बांधवांसाठी सामाजिक न्याय विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांतून त्यांना सहाय्यभूत साधनांचे वाटप करावे, असे श्री. आठवले यांनी सांगितले. तसेच, आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजना, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, उज्ज्वला योजना, प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, सफाई कामगारांसाठीच्या योजना, अटल पेन्शन योजना आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांचा आढावा त्यांनी घेतला. लातूर जिल्ह्यात मुलींची १३ आणि मुलांची १२ अशी एकूण २५ शासकीय वसतिगृहे कार्यरत असून त्यांची एकूण प्रवेश क्षमता २ हजार ८४५ आहे. सन २०२४-२५ मध्ये जिल्ह्यातील २ हजार ८७६ विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ देण्यात आला आहे. यावर्षीपासून तालुकास्तरावरही ही योजना राबविली जाणार असल्याचे समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांनी सांगितले. गतवर्षी इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतच्या ३३ हजार १६१ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला. तसेच, दिव्यांग बांधवांसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजनेतून गेल्या तीन वर्षांत ११६ दाम्पत्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे सहाय्य देण्यात आल्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी सांगितले.

## नेरूळ एक जयंती एक मिरवणूकीला भिम सैनिकांचा प्रचंड प्रतिसाद

जयभीम पॅन्थर हा सिनेमा १९८७ च्या आठवणी जागृत करतो जागृतीचा विस्तव सतत तेवत ठेवा..! नेरूळ जयंती उत्सव समितीच्या वतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल जयंती दिनी बाबासाहेबांच्या तैलचित्राची भव्यदिव्य मिरवणुक काढल्या नंतर दिनांक - १५ एप्रिल २०२५ रोजी जयभीम पॅन्थर हा चित्रपट सानपाडा येथील फन स्क्वेअर या चित्रपटगृहाचे संपूर्ण थिएटरच बुक करून पदाधीकारी व कार्यकर्त्या समवेत महाराष्ट्राची हास्य जत्रा सुप्रसिद्ध सुपरस्टार, जयभीम पॅन्थर : गौरव मोरे सह जयभीम पँथर सिनेमा टिमचे सानपाडा थिएटरमधे जंगी स्वागत करण्यात आले. नवी मुंबई / के. एच. हनवते :- नेरूळ जयंती उत्सव समितीच्या वतीने दिनांक - १४ एप्रिल २०२५ रोजी महामानव प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्यदिव्य तैलचित्राची मिरवणूक थाटामाटात काढल्यानंतर दिनांक - १५ एप्रिल २०२५ रोजी नेरूळ जयंती उत्सव समिती नवी मुंबई यांच्या वतीने जयभीम पॅन्थर हा सिनेमा, संपूर्ण थिएटरच बुक करून जयंती उत्सव समिती चे पदाधिकारी व कार्यकर्ते यांना दाखवण्यात आला, तत्प्रसंगी चित्रपट निर्माते : भन्ते करुणासागर थेरो, कलाकार आयु. जयवंत वाडकर व महाराष्ट्राची हास्य जत्रा सुपरस्टार : गौरव मोरे ( जयभीम



पॅन्थर फेम ) व इतर कलाकारांचा छोटेखानी सत्कार करण्यात आला. थिएटर छोटे असल्याने तिकिटांसाठी अधिक मागणी असूनही समितीद्वारे क्षमतेपेक्षा जास्त तिकिटांची अपेक्षा पूर्ण करु शकलो नाही, याबद्दल क्षमस्व याकरिता नेरूळ जयंती उत्सव समितीच्या वतीने नवी मुंबईतील सर्व विभागातील स्थानिक संस्था संघटना यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, आपणही आपल्या संस्थेच्या माध्यमातून आपल्या विभागातील जवळच्या थिएटरमध्ये ह्या सिनेमाचा शो आयोजित करण्यासाठी थिएटर व्यवस्थापक यांच्या नावाने संस्थेचे एक पत्र तयार करुन एकत्रितपणे थिएटर व्यवस्थापकाला देण्यात आले पाहिजे. तरच थिएटर बूक होऊ शकेल. त्याचप्रमाणे वरील चित्रपटाचा दुसरा भाग तयार करण्यासाठी निर्मात्यांकडे आर्थिक नीधीची उपलब्धता असणे अत्यावश्यक आहे. आपल्या जनसमुदायाचा भरघोस पाठिंबा असेल तरच चित्रपट अपेक्षेनुसार यशस्वी होईल. कृपया नवी मुंबईतील सर्व संस्था संघटनांनी आवश्यक ती कार्यवाही करावी हीच अपेक्षा, लवकरच गॅन्ड सेंटर मॉल सिवुडस येथे जयभीम पॅन्थर सिनेमा लवकरात लवकर लावावा आशी विनंती आम्ही थिएटर मालकाशी करणार आहोत. आपले विनीत : नेरूळ जयंती उत्सव समिती, नवी मुंबई.

## आमदार अमित देशमुख यांच्याकडून बनसोडे कुटुंबीयांचे सांत्वन

लातूर / प्रतिनिधी:- लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दत्तात्रय बनसोडे गुरुजी यांचे नुकतेच निधन झाले. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आणि लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दिनांक १८ एप्रिल रोजी सायंकाळी लातूर तालुक्यातील गंगापूर येथे जाऊन दत्तात्रय बनसोडे गुरुजी यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. तसेच कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि त्यांना



धीर दिला. यावेळी सुमित दत्तात्रय बनसोडे, लातूर शहर जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन रवींद्र काळे, चंद्रशेखर दंडीमे, डॉक्टर सतीश कानडे, तानाजी फुटाणे, भास्कर पाटील, बालाजी भिसे आदींसह कॉँग्रेस पक्षाचे विविध

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त,सेवाभावी वृत्तीतून अनोखी मानवंदना..





अंबरनाथ (प्रतिनिधी) : आधुनिक अखंड भारताचे प्रणेते,विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त अंबरनाथ येथील सामाजिक कार्यकर्ते आणि समाजसेवक संजयकुमार दत्तात्रय सुर्यवंशी यांनी आपले वडील दत्तात्रय राजाराम सुर्यवंशी यांच्या स्मृति प्रित्यर्थ सबरबिया संकुल अंबरनाथ येथे स्थानिकांसाठी आरोग्य शिबीराचे आयोजन करुन सुमारे २०० गरजूंची नेत्र तपासणी,रक्त तपासणी,ईसीजी, डेंटल चेक अप, छीश्रेसळलरश्र चेक अप अशा अनेक महत्वाच्या विविध मोफत आरोग्य तपासण्या केल्या.तसेच आई शारदाबाई दत्तात्रय सुर्यवंशी यांच्या हस्ते निर्विक बॉईज फुटबॉल संघाच्या फुटबॉलपटूंना मोफत टि शर्ट आणि फळ वाटपही करण्यात आले. प्रती वर्षाप्रमाणे यावर्षीही सुर्यवंशी यांनी यावर्षीही आपली सेवाभावी वृत्ती जपत बाबासाहेबांना



अनोखी मानवंदना दिली. त्यांच्या सेवाभावी वृत्तीबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे. सामाजिक बांधिलकी आणि समाज भावना जपत संजयकुमार सुर्यवंशी हे सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत.एक निस्वार्थी, दानशूर,सेवाभावी आदर्श व्यक्तीमत्व म्हणून ते ओळखले जातात. आजतागायत वृध्दाश्रमांतील वृध्दांना दान,अनाथ मुलांना शैक्षणिक मदत,नवोदित होतकरु मुलांना टि शर्ट,फुटबॉल, क्रिकेट बॅटचे वाटप,विविध सणांच्या शोभायात्रांना पुलाव,खीर,बिस्कीट,पाणी वाटप,कोरोना काळात अनेक कुटुंबांना मदतीचा हात,कोरोना तपासणीसाठी अनेकांना आर्थिक मदत,कोरोना काळात काही मृतदेहांवर स्वतः अंत्यसंस्कार,महाड,चिपळूण महापूरातील पुरग्रस्तांना अन्न धान्य, संसार उपयोगी अत्यावश्यक साहित्य वाटप,गरीब मुलामुलींच्या लग्नाकरीता मदत,बाळंतपणासाठी मदत,नातलग,मित्र मंडळी,ओळखीच्या तसेच अनोळखी मंडळींना अडचणीत मदत,अनेक रुग्णांच्या मोफत रक्त तपासण्या,बुध्द विहारे,स्मारक व इतर उपक्रमांना तसेच पुस्तक प्रकाशनाला मदत अशा अनेक प्रकारे त्यांनी आपली सेवाभावी वृत्ती दाखवून दिली आहे.





नोट :- निमंत्रण पत्रिका सर्वांनाच दिलेली आहे. जर नजर चुकीने कोणाला मिळाली नसेल तर हीच निमंत्रण पत्रिका समजून या मंगल परिणयास उपस्थित रहावे ही नम्र विनंती

# संपादकीय

## महाराष्ट्र हितावर घाला!

राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीच्या निमित्ताने महाराष्ट्रात प्राथमिक शिक्षणात हिंदीचा शिरकाव करत राज्याचेच हिंदीकरण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत की काय, असा प्रश्न यासंदर्भातील सरकारच्या ताज्या निर्णयाने निर्माण झाला आहे. राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी नवा आराखडा तयार केला असून पहिलीपासूनच मराठी आणि इंग्रजीबरोबर हिंदी भाषेची सक्ती करण्यात आली आहे. चालू शैक्षणिक वर्षापासून तिची अंमलबजावणीही केली जाणार आहे. हा अट्टहास कशासाठी, असा प्रश्न पडणे साहजिक आहे.

याचे कारण, हिंदीने राज्यात केव्हाच हातपाय पसरले आहेत. मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पुण्यासह अर्ध्याहून अधिक महाराष्ट्राचे अघोषित हिंदीकरण झाले असताना आता हे मराठीचा गळा घोटणारे नवे धोरण संपूर्ण राज्यात आणि तेही पहिलीच्या इयत्तेपासून लागू करून उरलीसुरली मराठीही गाळात घालण्याचे प्रयत्न सुरू आहेत की काय, याची शंका त्याचमुळे येते. एकीकडे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा द्यायचा आणि दुसरीकडे तिचे पंख छाटायचे ही दुटप्पी भूमिका नक्कीच मराठी भाषा, महाराष्ट्र आणि मराठी माणसाच्या हिताची नाही. त्यामुळेच निर्णयाला होणारा विरोध समर्थनीय ठरतो. शिक्षण क्षेत्रातून अपवादानेच निर्णयाचे स्वागत होताना दिसते वा झाले, हे लक्षात घ्यावे लागेल. मराठीची बलस्थाने, मराठीचे आणि मराठी माणसाचे देशाच्या विकासातील योगदान, देशाचा आर्थिक गाडा चालवणार्या मुंबईची मोलाची भूमिका या सार्याचाच विसर पडला आहे की काय? वास्तविक, हिंदीचा पर्याय ठेवून निर्णयाची अंमलबजावणी करता आली असती; मात्र हा निर्णय राज्यावर अक्षरश: लादण्यात आला असून त्याच्या परिणामांचा विचारच झालेला दिसत नाही.

राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना पहिलीपासून हिंदी भाषेशिवाय अन्य भारतीय भाषांचेही पर्याय उपलब्ध करून देण्याची शिफारस अभ्यासक्रम आराखडा सुकाणू समितीने केली होती; मात्र ती डावलून शिक्षण विभागाने हिंदीची सक्ती केली. हा निर्णय घेताना शिक्षण विभागातील अधिकार्यांनी बुद्धी गहाण ठेवली होती का, असा प्रश्न निर्माण होतो. हिंदीचा समावेश केल्यामुळे मराठीचे महत्त्व कमी होणार नाही, मराठीशी दुजाभाव केला जाणार नाही, असा शिक्षण विभागाकडून केला जाणारा दावा फसवा आहे. या असल्या वरवरच्या आणि पोकळ खुलाशामुळे सामान्य नागरिकांचे समाधान होण्याची अजिबात शक्यता नाही. आज केवळ मुंबईचाच नव्हे, तर नागपूर, अमरावती, नाशिक, संभाजीनगर, सांगली, कोल्हापूर, पुणे असे सर्वत्रच उत्तर भारतीय आणि बिहारींच्या वाढत्या लोकसंख्येने मराठीवरही मोठे आक्रमण झाले आहे. त्याचवेळी त्यांची दादागिरीही वाढू लागली आहे. मराठी लोकांना जागा न देणे, मराठी फेरीवाल्यांना हाऊसिंग सोसायटीत प्रवेश नाकारणे, कंपनीमध्ये मराठी बोलण्यास बंदी करणे, मराठी लोकांना तुच्छ समजून शिवीगाळ आणि मारहाण करणे यासारखे प्रकार वाढीस लागले आहेत. यात भरीस भर म्हणून हिंदीचा आता थेट शिक्षणातच अंतर्भाव करून कोणाची सोय केली जात आहे?

हिंदीचा समावेश केल्यामुळे मराठीचे महत्त्व कमी होणार नाही. उलट हिंदीच्या पाठ्यपुस्तकांतील अक्षरगट मराठीप्रमाणे करण्यात येत असल्याचा युक्तिवाद एससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार यांनी केला आहे; मात्र हा तर्क फोल आहे. याचे कारण, मुळात पहिलीपासून हिंदी शिकण्याची सक्ती करण्यात आली असून, या सक्तीला आक्षेप आहे. आतापर्यंत पाचवीपासून हिंदी शिकवली जात होती. आठवीला हिंदीसह संस्कृत भाषेचा पर्याय उपलब्ध होता. त्याशिवाय परकीय भाषाही उपलब्ध आहेत. जगभरच्या तज्ज्ञांनी मातृभाषेतूनच शिक्षण मिळावे, यास प्राधान्य दिले आहे. रामकृष्ण मोरे शिक्षणमंत्री असताना राज्यात पहिलीपासून इंग्रजी शिकवण्यात येऊ लागली. त्यावेळी काही शिक्षणतज्ज्ञांनी त्यास विरोध केला होता; पण गरिबांच्या मुलांनी इंग्रजी शिकू नये का? पहिलीपासून इंग्रजी शिकल्यास, त्यांना उत्तम नोकरी मिळू शकेल आणि जीवनात मुले यशस्वी होतील, असे त्यांचे समर्थन करण्यात आले. इंग्रजी ही जागतिक व्यवहाराची भाषा असल्याने तिला फारसा विरोध झाला नाही; पण तृतीय भाषा म्हणून हिंदीची सक्ती करण्यापेक्षा विद्यार्थ्यांनाच भाषा निवडण्याचे स्वातंत्र्य देणे आवश्यक होते.

देशात संपर्कसूत्र तयार करण्यासाठी हिंदी ही एक भाषा आहे, असेही म्हटले जाते; पण हिंदीशिवाय संपर्काचे घोडे कुठेही अडलेले नाही, हे लक्षात घ्यावे लागेल. केरळ, तामिळनाडू, आंध्र, कर्नाटक या दक्षिणी राज्यांत भाषिक अस्मिता तीव्र आहे. सर्वसामान्य जनता त्या-त्या स्थानिक भाषेतील साहित्य वाचते. तेथील जनता मातृभाषेतच बोलते आणि सर्व ठिकाणच्या पाट्या त्या त्या राज्याच्या भाषेतील असतात. महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबई असून, येथे कित्येक दशके अन्य राज्यांतून नोकरी-धंद्यासाठी येणार्या लोकांची संख्या प्रचंड आहे. शिवाय हिंदी चित्रपट उद्योग मुंबईतच असल्यामुळे येथील समाजजीवनावर हिंदीचाही ठळक ठसा आहे. हिंदी भाषा आणि भाषकांमुळे नवनवे प्रश्न निर्माण होत आहेत, याचेही भान ठेवले पाहिजे. प्रत्येक भाषेचा विचार करून महाराष्ट्रासह विविध राज्ये स्थापन झाली, तरीही भाषिक संघर्ष संपलेले नाहीत. आज जगातील जपान, फ्रान्स, जर्मनी, चीन, रशिया अशी कित्येक राष्ट्रे त्यांची मातृभाषाच वापरतात. भारतात प्राचीन काळात संस्कृत मातृभाषा होती. मोगली आक्रमणामुळे हिंदी भाषा फोफावली. त्यामुळे संस्कृत आता मृतभाषा झालेली आहे.

मराठी भाषेचा अभिमान बाळगायचा, उदोउदो करत इतर भाषाही लहान मुलांवर लादायच्या, हे थांबले पाहिजे. आज हिंदी व इंग्रजीच्या आक्रमणामुळे मराठी भाषा बोललीच जात नाही, अशी महाराष्ट्राची अवस्था आहे. राज्यकर्त्यांनी मुंबईत मराठी भाषा किती बोलली जाते, याचा प्रथम अभ्यास करावा. कारण, मुंबईत मराठी ही संस्कृतप्रमाणेच मृतभाषा झालेलीच आहे. हिंदीच्या या नव्या आक्रमणामुळे मुंबईसह महाराष्ट्रातूनच मराठी हद्दपार होईल, याचे भान राज्यकर्त्यांनी ठेवावे. त्यादृष्टीने महाराष्ट्रहित जपावे, हीच तमाम मराठी माणसाची भावना आहे.

# भाषा ही संस्कृतीची आस्था असल्याने तीचा धर्माशी काहीही संबंध नाही.

भारतातील प्रत्येक भाषा संस्कृतीच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या आहेत; ज्याप्रमाणे गंगा,यमुना,कावेरी,गोदावरी, तापी, कृष्णा, नर्मदा इत्यादी अनेक नद्यांच्या सोज्वळ आणि निर्मळते मधुनच भारतीय भाषेचा उगम झाला आहे.त्यामुळे त्याला धर्माशी जोडता येणार नाही.आपण जगात कुठेही जा परंतु भारतीय संस्कृती,भाषा,वेगवेगळे रहाणीमान, खानपान, व्यंजनाचे वेगवेगळे प्रकार या संपूर्ण परंपरा हजारो वर्षांपासून भारतातुनच निर्माण झालेले वटवृक्ष आहे आणि तीच परंपरा आताही सुरूच आहे.भाषा ही विचारांच्या देवाणघेवाणीचे एक मोठे माध्यम आहे.तिच्या माध्यमातून विविध आचार-विचार आणि श्रध्दा असलेले लोक जोडले जातात.ती त्यांच्या विभाजनाचे कारण बनू नये,अशी अपेक्षा व्यक्त करत नगरपरिषदेच्या क्षेत्रात राहणारे लोक किंवा लोकांचा समूह उर्दू भाषेशी परिचित असेल तर किमान नगर परिषदेच्या फलकावर अधिकृत भाषेव्यतिरिक्त म्हणजेच मराठी व्यतिरिक्त उर्दू वापरल्यास कोणताही आक्षेप नसावा असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.भारतात अनेक धर्मांचे लोक रहातात.त्यामुळे भाषा आणि धर्म याचा कुठेही संबंध जुळुच शकत नाही.कारण भारतात २८ राज्य व ८ केंद्रशासित प्रदेश आहेत त्या-त्या अनुषंगाने भाषेचे सुध्दा वर्णन होत असते. उदाहरण द्यायचे झाले तर महाराष्ट्रांतील मराठी, गुजरात मधील गुजराती, तामिळनाडू मधील तामिळ अशा प्रकारे प्रत्येक राज्यात भाषेचे आगळेवेगळे रूप दिसुन येते व त्याची गणना समाजामध्ये होते.त्याचप्रमाणे उर्दू भाषेचा जन्म सुद्धा भारतातील आहे तिचा धर्माशी काहीही संबंध नाही.इंग्रजी भाषा ही इंग्रजांनी भारतावर लादलेली भाषा आहे.त्यामुळे इंग्रजी भाषा सोडली तर भारतातील संपूर्ण भाषांची नाळ भारतभूमीतच गाडली आहे. महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपरिषदेतील फलकावर उर्दू भाषेच्या वापराला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली उर्दू भाषा हा धर्म नाही.ही लोकांमध्ये फूट पाडण्याचे कारण बनू नये.उर्दू हे गंगा-यमुना संस्कृती (गंगा-जमुनी तहजीब) किंवा हिंदुस्थानी संस्कृतीचे उत्तर उदाहरण आहे, असे हा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.भाषा म्हणजे कोणताही धर्म नाही ती धर्माचे प्रतिनिधित्वही करीत नाही असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. भाषा म्हणजे एखाद्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप आहे.उत्तर आणि मध्य भारतातील मैदानी भागांचे मिश्र सांस्कृतिक स्वरूप असलेल्या गंगा-यमुना संस्कृती किंवा हिंदुस्थानी तहजीबचे उत्तम उदाहरण असलेल्या उर्दूच्या बाबतीतही हेच आहे.सर्वोच्च न्यायालय म्हणतो की, उर्दू ही भारतासाठी परकी आहे, या गैरसमजातून उर्दूविषयीचा पूर्वग्रह निर्माण झाला आहे. उर्दू हीदेखील मराठी आणि हिंदीप्रमाणेच इंडो-आर्यन भाषा आहे व या भूमीत जन्माला आलेली ही भाषा आहे अशा स्पष्ट शब्दात सांगितले.भाषेचा विरोधच करायचा असेल तर इंग्रजी भाषेचा करावा आणि करायला पाहिजे. कारण देशातील इतर भाषांना इंग्रजी भाषा पोखरत असुन देशात घर करण्याचा प्रयत्न करीत आहे याकडे भारतीयांनी लक्ष देण्याची गरज आहे. आज भारतातील प्रत्येक राज्यातील वेगवेगळ्या भाषेचा गोडवा पहायला मिळतो.याहीपलीकडे आपण गेलो तर प्रत्येक राज्याच्या ४० किलोमीटर अंतरानंतर आपल्याला तेथील भाषा,रहनसहन आणि संस्कृती यांचेही आगळेवेगळे दर्शन होते.म्हणजे इंग्रजी भाषा सोडली तर भारतातील प्रत्येक भाषा हिंदुस्थानच्या रक्तात आणि नसानसामध्ये दिसून येते. त्यामुळे उर्दू भाषा भारतीयांसाठी नवीन नसुन ती आपलीच आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे. भारतातील प्रत्येक भाषा ही दैवी देण असुन ती सर्वांनीच स्विकारली पाहिजे.कारण हिंदू,बौद्ध,शिख, ईसाई, मुस्लिम या संपूर्ण धर्मांच्या साधुसंतांनी, महाज्ञानी, तपस्वी यांच्या परिश्रमातूनच भारतातील प्रत्येक भाषेचा उगम झाला आहे व ते सर्वांचेच श्रध्दा स्थान आहे.त्यामुळे भारतातील कोणतीही भाषा धर्माशी जोडली जावू शकत नाही.भाषा ही ईश्वरी देण आहे तीचा आदर व्हायलाच पाहिजे.त्याचप्रमाणे देशातील प्रत्येक राज्यांनी आपापल्या राज्यातील भाषेचा वापर जास्तीत जास्त करावा यामुळे प्रत्येक राज्यातील मातृभाषा सुरक्षित राहील.कारण मातृभाषा ही कोणाही कडून शिकविली जात नाही ती जन्मताच अवगत होत असते म्हणूनच तिला मातृभाषा म्हटल्या जाते.त्यामुळे देशातील संपूर्ण भाषा, मातृभाषा आणि राष्ट्रीय भाषेचा आदर सर्वांनीच केला पाहिजे.यामुळे देशातील संपूर्ण भाषा व बोली सुरक्षित राहील.जय हिंद!

***********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# सर्वांगीण उन्नतीचा विचार म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर!

नुकतीच महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांची १३४ वी जयंती भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोठ्या थाटामाटात आणि उत्साहात साजरी करण्यात आली.हि एकमेव भीमजयंती आहे, की ती जगात साजरी केली जाते.त्याचे कारणही तसेच आहे.बाबासाहेबाकडे जी विद्वत्ता होती ती जगात इतर कोणाकडेही नव्हती आणि नाही.त्यांच्या विद्वत्तेमधला त्यांचा सर्वांगीण उन्नतीचा विचार जगाला समजला आणि म्हणून जगात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी केली जाते. जगात त्यांना ज्ञानाचे प्रतिक मानले गेले आहे.

मराठीत एक म्हण आहे. सोन्याचा अलंकार माणसाचे फक्त शरीर चमकवतो,पण ज्ञानाचा अलंकार संपूर्ण जग चमकवतो. संपूर्ण जग प्रकाशित करतो.आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्ञानाचा अलंकारच होते व आहेत.कारण त्यांनी आपल्या विद्वत्तेच्या महान कृतीतून सर्व जगाला स्तंभीत केले.आणि म्हणून जगाच्या इतिहासात त्यांचे नाव सुर्यप्रकाशासारखे चमकत आहे.अशा जगविख्यात विद्वान महामानवांची जयंती संपूर्ण जग साजरी करतो. सर्व जगात साजरी केली जाते. त्यांची जयंती जगातील सर्वात मोठा उत्सव म्हणून साजरा केला जातो.

कारण ज्ञान कसे घ्यावे, ज्ञानाची वाढ कशी करावी, आणि ज्ञानाचा वापर कुठे आणि कसा करावा हे जर शिकायचे असेल तर डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या आदर्शातून आम्हाला शिकता येईल. कारण जगात एकमेव डॉ बाबासाहेब आंबेडकर होऊन गेले की त्यांनी अठरा अठरा तास तर कधी एकविस एकविस तास अभ्यास केला.ज्ञान घेण्याचा खूप मोठा आदर्श आमच्या समोर ठेवला. त्यांची विद्वत्ता म्हणजे आपल्या सर्वांच्या उन्नतीचा विचार आहे. न्यायशास्त्र,समाजशास्त्र,अर्थशास्त्र,राज्यशास्त्र,इतिहासतज्ञ,मानवशास्त्रतज्ञ,मानववंशशास्त्रतज्ञ,तत्वज्ञानाचे तत्वज्ञ म्हणून त्यांची जगभर ख्याती आहे.

जगात जेवढे काही विद्वान झाले.त्या विद्वानापैकी डॉ बाबासाहेब आंबेडकर नंबर एक चे विद्वान ठरले. अमेरीकेमधील कोलंबिया विद्यापीठाने त्यांना जगातील एक नंबर चे विद्वान ठरवले आहे.अमेरीकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा जेव्हा भारतात आले होते तेव्हा त्यांनी भारताच्या संसदेत भाषण देतांना म्हटले होते. आमच्या देशात जर का डॉ बाबासाहेब आंबेडकर जन्माला आले असते, तर पृथ्वीला प्रकाशमान करणारा हा जो सुर्य आहे, त्या सुर्याला आम्ही डॉ बाबासाहेब आंबेडकर हे नाव दिले असते.यावरुन आपल्याला दिसते जगात त्यांच्या विद्वत्तेचं किती मोल आहे.

ऊ.बाबासाहेब आंबेड़कर ळी I ू षरींहशी ळप शलेपोळल नोबेल पारितोषिक विजेते अमर्त्य कुमार सेन यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांबद्दल काढलेले उद्गार आहेत.

इतिहासाची हजारो पाने भरलेली दिसतील पण बाबासाहेबांच नाव इतिहासाच्या पानावर तार्यांप्रमाणे चमकत आहे.

अशा या महामानवांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू या गावी जन्म झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कॅम्प स्कूल सातारा येथे झाले. १९०१ मध्ये चौथी परिक्षा उत्तीर्ण झाले.१९०७ १० वी ची परिक्षा उत्तीर्ण झाले.१९०८ला एल्फिन्स्टन कॉलेज मध्ये प्रवेश घेतला.आणि १९१३ ला बी. ए. ची परिक्षा उत्तीर्ण झाले. पुढे जुलै १९१३ ला उच्च शिक्षणासाठी अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात प्रवेश येथे त्यांनी अठरा अठरा तास अभ्यास केला आणि २जुन १९१५ ला एम ए ची पदवी मिळवली. पुढे प्राचीन भारतातील व्यापार या विषयावर प्रबंध लिहून कोलंबिया विद्यापीठाला सादर केला.१९१७ मध्ये दि नॅशनल डिव्हिडंट ऑफ इंडिया- ए हिस्टारिकल ॲनालाटिकल स्टडी हा प्रबन्ध सादर केला. कोलंबिया विद्यापीठाने डॉ बाबासाहेब आंबेडकरांना पीएचडी हि पदवी बहाल केली.(डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी लिहलेला प्रबंध अर्थशास्त्राच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा आहे.) याच काळात त्यांनी भारतातील जाती-त्यांची घटना उत्पत्ती आणि वाढ हा निबंध पण लिहला. हा निबंध पुस्तक रुपाने प्रकाशित आहे.

कोलंबिया विद्यापीठात प्रबंध सादर करेपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो अभ्यास केला त्याबाबतीत ब्लेक क्लार्क म्हणतो. ज्ञानार्जनाच्या बाबतींत भीमरावांनी जो आपल्या विद्यार्थी दशेत भयंकर आधाशीपणा दाखविला तसा आधाशीपणा दाखवणारे विद्यार्थी क्वचितच पाहण्यात येतात.यावरून एक गोष्ट लक्षात येते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना जेवणापेक्षाही ज्ञानाची भूक त्यांना जास्त होती. पावाच्या एका तुकड्यावर राहुन त्यांनी एवढा मोठा अभ्यास केला.

१९१७ ला भारतात परत आले. १९१९ मध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नोकरी केली.१९२०माणगाव आणि नागपूर च्या अस्पृश्य परिषदेत सहभागी झाले. नंतर १९२० मध्ये मूकनायक हे पाक्षिक सुरु केले.मूकनायकाच्या माध्यमातून मुक्यांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले.आणि येथूनच अस्पृश्यांच्या मुक्ती आंदोलनाचा लढा सुरु झाला. याच काळात ते लंडनला गेले १९२१मध्ये एम एससीची पदवी मिळवली. द प्रॉब्लेम ऑफ रुपी लंडन विद्यापीठाला सादर करुन १९२२ मध्ये डीएससी पदवी मिळवली. हि पदवी मिळवणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर पहिले भारतीय ठरले. १९२३ मध्ये ते बॅरिस्टर झाले. १९२३ मध्ये दि प्रॉब्लेम ऑफ रुपी हा ग्रंथ प्रकाशित झाला. याच ग्रंथाच्या आधारावर भारतात रिझर्व्ह बँकेची स्थापना झाली.

याच काळात कोलंबिया विद्यापीठातून एल एल डी हि पदवी मिळवली. डी लिट हि पदवी उस्मानिया विद्यापीठातून मिळाली. १९२३ मध्ये त्यांनी बॅरिस्टरचा व्यवसाय पण केला. पण फार काळ नाही.

अस्पृश्य लोकांना सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्यास मनाई होती. म्हणून २० मार्च १९२७ रोजी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला.वास्तविक पाहता त्या तळ्यात जनावरे पाणी पिता होते.पण सत्याग्रह करण्याचा उदेश्य समानता,प्रतिष्ठेचा होता.तो त्यांनी मिळवून दिला.आणि ज्या ग्रंथाने हे सर्व हक्क अधिकार नाकारले होते.त्या मनुस्मृती ग्रंथाचे २५डिसेंबर १९२७ रोजी रायगडाच्या पायथ्याशी दहन केले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणतात खालच्या वर्गाची ज्याच्यामुळे प्रगती खुंटुन त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागले, तो न्युनगंड त्यांच्यापासून नाहीसा करणे चालू समाज पध्दतीमुळे जे त्यांचे जीवन लुबाडण्यात आले, त्यांचे त्यांच्या स्वतःच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीनं काय महत्त्व आहे, याची त्यांना जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. हे उच्च शिक्षणाच्या प्रसाराशिवाय दुसरे कशानेही शक्य होणार नाही. पुढे ते म्हणतात फ्रांसिस बेकन ज्ञानाला शक्ती मानतो. ते उचित आहे.कारण जुन्या परंपरावादी समाज रचनेला बदलून टाकण्याची ताकद ज्ञानात आहे. त्यामुळे खालच्यांना उन्नत होण्याची संधी मिळते.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी अतोनात मेहनत घेत शिक्षण घेतले आणि युगानुयुगे चालू असलेल्या रुढी परंपरा तोडण्यासाठी प्रचंड मोठा संघर्ष उभा केला. लढा उभारला, खूप मोठी क्रांती केली.क्रांत्या दोन प्रकारच्या आहेत एक रक्त रंजित क्रांती आणि दुसरी शांततामय क्रांती.डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी शांतीच्या, न्यायाच्या मार्गाने क्रांती केली.आणि अस्पृश्यांना गुलामगिरीच्या जाचातून मुक्त करुन स्वतंत्र केले.शिका संघर्ष करा आणि संघटित राहा. हा मंत्र दिला.

१९२७ लाच बहिष्कृत भारत हे पाक्षिक सुरु केले.बहिष्कृत पत्रातून अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकांची व्यथा त्यांनी मांडली,त्यांच्यात सुधारणा,त्यांची उन्नति कशी होईल.हे बहिष्कृत भारत या वृत्तपत्रातून मांडले.आणि १९३०मध्ये जनता पाक्षिक पण सुरु केले.

१९३०मध्येच पहिल्या गोलमेज परिषदेसाठी लंडन ला गेले.तिथे त्यांनी अस्पृश्यासाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली.परत १९३२ मध्ये दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठी ते लंडन ला गेले.म्हणजे बाबासाहेब आंबेडकरांना कितीतरी कामे करावे लागले.शिक्षण घेणे, वृत्तपत्र चालवणे,अश्पृशांच्या न्याय हक्कासाठी लढा देणे,परिषदांना उपस्थित राहणे,आंदोलन करणे,साधी सोपी गोष्ट नव्हती.आणि एवढे सगळे करुन अभ्यास करणे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर ब्रिटिश सरकारमध्ये कामगार मंत्री असताना त्यांनी कामगारांच्या हिताचे कामे केली.जसे भारतीय कामगार संघटना सुधारणा विधेयक सादर केले.ट्रेड युनियन मुळे कामगारांना संप करण्याचा अधिकार मिळाला. तसे नियम ब्रिटिश सरकारला करायला लावले.

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना ज्ञानाची खूप गोडी होती. ते जीवन जगण्यासाठी जशी मणुष्याला अन्नाची गरज आहे.तशीच त्याला जीवन जगण्यासाठी ज्ञानाची गरज आहे.हे त्यांनी ओळखले आणि ८जुलै १९४५ मध्ये त्यांनी पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली.देशातील गोरगरीबांना शिक्षणाच्या सोयी उपलब्ध व्हाव्यात मागासलेल्या सर्व जाती जमाती मधील मुलांना उच्च शिक्षण मिळावे हा त्यांचा उद्देश होता. तसेच शिष्यवृत्ती,वसतीगृहे,मोफत शिक्षण हि ध्येय धोरणे पिपल्स एज्युकेशन सोसायटीची होती.पुढे २०जुन १९४६ मध्ये मुंबई येथे सिध्दार्थ कला वाणिज्य महाविद्यालय स्थापना केली .त्यानंतर औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन केले. गोरगरीबांना राहण्यासाठी वसतिगृह सुरु केले. पण दुर्दैवाची गोष्ट सरकारात बसलेल्या लोकांनी बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या शिक्षण संस्थांकडे दुर्लक्ष केले. त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी कोणताही प्रयत्न केला नाही. उलट बाबासाहेबांनी निर्माण केलेल्या शैक्षणिक संस्था मोडकळीस कशा येतील हाच प्रयत्न केला.

१९४७ते १९४९ या दोन वर्षे अकरा महिने १८ दिवस संपूर्ण देशाची राज्यघटना लिहिण्यात व्यस्त होते.देशातील प्रत्येक माणसाचे हित लक्षात घेऊन त्यांनी या देशाचे संविधान लिहले व खूप मोठी लोकशाही या देशात निर्माण केली.लोकशाहीची व्याख्या करताना ते म्हणतात,लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात रक्तपात न घडता क्रांतीकारक बदल घडून येणे म्हणजे लोकशाही.भारतीय संविधान करोडो भारतीयांचा श्वास आहे.सर्व जाती, धर्म पंथ संप्रदायाच्या लोकांनी स्वाभिमानाने व निर्भयपणे जगण्याचा तो एक विश्वास आहे.संविधानामुळे आज हा देश टिकून आहे. समता,बंधुत्व व न्यायाचे राज्य आहे.अन्यथा केव्हाची या देशात अराजकता माजली असती. व देश लयाला गेला असता. म्हणून पंडित नेहरूंनी त्यावेळेस म्हटले होते.घटनेचे शिल्पकार या शब्दात डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख केला जाईल.घटनानिर्मितीच्या कामी त्यांच्या इतके कष्ट आणि परिश्रम दुसऱ्या कोणीही घेतलेली नाही.त्यांच्या जीवनातील मुख्य गोष्ट ही की समाजातील एका पध्दती विरुध्द त्यांनी दंड थोपटले होते.या पध्दती विरुद्ध आम्हीही दंड थोपटले पाहिजे.

लार्ड जॉन गंथर १९३८ मध्ये इन्साईड आशिया नावाचे पुस्तक लिहिले त्यात ते लिहितात संसार में सभी लोग रहने के लिए मकान बनाते हैं। मगर बाबासाहेब ने पुस्तकोकी रक्षा के लिए मकान बनवाया है। बंबई मे राजगृह मे पचास हजार पुस्तके है। उनमे ३५००० किताबों में कोई ऐसी किताब नहीं थी, जिसमें बाबासाहेब के अध्ययन के निशान ना हो! अमेरिकेत असताना त्यांनी २००० पुस्तके खरेदी केली. लंडनला असताना तीन पेट्या पुस्तके त्यांनी मुंबईला पाठवली. त्यांना ज्ञानाची किती मोठी आस होती हे दिसून येते.

डॉ बाबासाहेब आंबेडकर स्त्री मुक्तिदाता होते. स्त्रियांना प्रतिष्ठा मिळावी, त्यांची उन्नति व्हावी, वारसा हक्क, पोटगीचा हक्क, विधवा पुनर्विवाह कायदा, विवाहित स्त्री संपत्ती संरक्षण कायदा, तलाक कायदा, सतीप्रथा प्रतिबंधक कायदा, बालिका विवाह प्रतिबंधक कायदा, प्रसुती अवस्थेत मिळायचे हक्क, या कायद्याचा व्यापकपणे विचार करणारी संहिता म्हणजे हिंदू कोड बिल! परंतु या हिंदू कोड बिलाला कांग्रेस मधल्या काही लोकांनी विरोध केला. सरकार जनतेच्या हितासाठी काम करत नाही. म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी २७ सप्टेंबर १९५१मध्ये आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला.

एवढे सारे करुन देशात कधी त्यांची, तर कधी त्यांनी लिहिलेल्या संविधानाची विटंबना होत असताना आपल्याला दिसते. हे खुप मोठे दुर्दैव आहे. आणि कुठे त्यांनी दिलेल्या हक्क अधिकारचा पण दुरुपयोग होतांना दिसतो.हेही दुर्दैवी गोष्ट आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा प्रत्येक विचार हा जनहिताचा आहे.

----------

विनोद सरदार
फुले आंबेडकर विद्वत सभा.
९६८९८४७११५

# हिंदीची शक्ती खपवून घेतली जाणार नाही – भाई जयंत पाटील शेकापचे मे महिन्यात विभागीय मेळावे तर मराठवाड्याचा केज येथे होणार

केज/प्रतिनिधी नवीन शैक्षणिक धोरणातील त्रैभाषिक योजनेनुसार, महाराष्ट्रातील इंग्रजी आणि मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये, तिसरी भाषा म्हणून, इयत्ता पहिलीपासून, हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. शासनाचा हा निर्णय मराठी भाषिकांवर हिंदीची सक्ती लादण्याचा प्रकार असून, महाराष्ट्रीय जनता हा अन्याय खपवून घेणार नाही असा इशारा माजी आमदार आणि शेकाप सरचिटणीस भाई जयंत पाटील यांनी दिला आहे. भाषावार प्रांत रचना आणि मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीकरिता, संयुक्त महाराष्ट्र समितीने दिलेल्या अविस्मरणीय संघर्षात, शेकापक्ष अग्रभागी राहिला असून, मराठी ही आमची मातृभाषा तर आहेच परंतु ती महाराष्ट्राची राजभाषा आणि महाराष्ट्राची अस्मिता आहे, असे प्रतिपादन भाई जयंत पाटील यांनी केले आहे. भारत हे एक संघराज्य असून राज्याची अस्मिता आणि स्वतंत्र अस्तित्व अबाधित राखलेच पाहिजे, ही भारतीय शेतकरी कामगार पक्षाची भूमिका असून, कोणत्याही भाषेची सक्ती, या देशात योग्य नाही. देशातील सर्व भाषांबद्दल आम्हाला आदरच आहे, तसा तो हिंदी बद्दलही आहे, ज्याला जी भाषा शिकायची असेल, तो ती भाषा शिकेल, सक्ती कशाला असा सवाल भाई पाटील यांनी केला आहे. हिंदी भाषेला राष्ट्रभाषा मानण्याबाबत देशात अजूनही एकमत नाही. हिंदी ही राष्ट्रभाषा असेल तर ती हिंदी भाषिक राज्ये वगळता इतर राज्यात अल्पसंख्य कशी ? असा सवालही पाटील यांनी केला आहे. महाराष्ट्रात हिंदी भाषेला अल्पसंख्य भाषेचा दर्जा प्राप्त आहे. महाराष्ट्रातील हिंदी भाषिकांच्या अनेक शैक्षणिक संस्थांना भाषिक अल्पसंख्य दर्जा प्राप्त होऊन, आरक्षणासह अनेक सवलती मिळत आहेत. हिंदी भाषिक शैक्षणिक संस्थांचा भाषिक अल्पसंख्य दर्जा काढून घेणार का ? असा सवालही भाई पाटील यांनी सरकारला केला आहे. राज्यातील शैक्षणिक अभ्यासक्रम ठरविणाऱ्या, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद – महाराष्ट्र या समितीलाही त्रिभाषिक सूत्रानुसार हिंदीची सक्ती करताना विचारात घेतलेले नाही, ही तर सरळ सरळ हुकूमशाहीच झाली असा घणाघात भाई पाटील यांनी केला आहे. भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या चिटणीस मंडळाची बैठक, शुक्रवार दिनांक १८ एप्रिल २०२५ रोजी पक्षाच्या फोर्ट मुंबई येथील मध्यवर्ती कार्यालयात संपन्न झाली. या बैठकीत इयत्ता पहिलीपासून हिंदी सक्तीला कडाडून विरोध करण्याचा व गरज पडल्यास महाराष्ट्रव्यापी तीव्र आंदोलन उभारण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला आहे. जनसुरक्षा विधेयकाला विरोध महाराष्ट्र सरकारने शहरी नक्षलवादाचा विमोड करण्याच्या नावाखाली, जनतेच्या अभिव्यक्तीचे व अन्यायाविरोधात संघटित होण्याचे अधिकार संपुष्टात आणण्यासाठी विशेष जनसुरक्षा विधेयक तयार केले आहे. या विधेयकामध्ये बेकायदेशीर कृती व बेकायदेशीर संघटना याबाबतच्या व्याख्या हेतूत: अत्यंत ढोबळ ठेवण्यात आल्या आहेत. कोणते कृत्य बेकायदेशीर आहे व कोणती संघटना बेकायदा आहे हे ठरविण्याचा अधिकार सरकारला देण्यात आला आहे. विधेयकानुसार सरकारने बेकायदेशीर म्हणून घोषीत केलेल्या संघटनेच्या सभासद व सहकाऱ्यांसाठी अनेक वर्षाचा कारावास व लाखो रुपयांचा दंड अशा भयानक तरतूदी प्रस्तावित करण्यात आल्या आहेत. अशा पार्श्वभूमीवर समविचारी पक्ष व संघटनांची एकजूट मजबूत करुन सर्व स्तरांवर या विधेयकाचा विरोध करण्याचा निर्णय शेकापक्षाने घेतला असून येत्या २२ एप्रिल २०२५ रोजी राज्यातील सर्व ग्राम, तालुका व जिल्हास्तरीय आंदोलनात हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याची हाक दिली आहे. शेतकरी कर्जमाफी, मुख्यमंत्री सौर उर्जा निर्मिती प्रकल्पाचे नावाखाली गायरान जमिनीचे अधिग्रहण आदी प्रश्नांवर आंदोलनाची हाक दुष्काळ, नापिकी आणि सरकारची शेतकरी विरोधी



धोरणे यामुळे शेतकरी घायकुतीला आला असून, शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण दिवसागणिक वाढतच चालले आहे. शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाच्या डोंगरामुळे त्यांचे जीणे हराम झाले असून, संपूर्ण कर्जमाफीकरिता राज्यव्यापी आंदोलन उभारण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. महाराष्ट्रातील विशेषतः मराठवाड्यातील अनेक गावातील गायरान जमिनीवर मुख्यमंत्री सौरउर्जा प्रकल्पाच्या नावाखाली गावकीच्या जमिनी खाजगी कंत्राटदारांच्या घशात घालण्याचा घाट या सरकारने घातला आहे. या जमीन अधिग्रहणकरीता ग्रामपंचायतीच्या ना हरकतीची अटही काढून टाकण्यात आलेली आहे. नाममात्र १ रुपये वार्षिक या दराने भाडे आकारून या जमिनी कंत्राटदारांच्या स्वाधीन केल्या जात आहेत. सरकारच्या या निर्णयाला तीव्र विरोध करण्याचा तसेच आगामी काळात राज्यव्यापी आंदोलन करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. पक्ष संघटना बांधणी आणि विस्ताराकरिता विभागीय मेळावे पक्षसंघटना बांधणी आणि पक्षविस्ताराकरिता बुलढाणा (विदर्भ), केज( मराठवाडा), सांगली (पश्चिम महाराष्ट्र), चाळीसगाव –जळगाव (उत्तर महाराष्ट्र) आणि मुंबई (कोकण) असे एकूण ५ विभागीय मेळावे आगामी मे महिन्यात आयोजित करण्याचा निर्णयही या चिटणीस मंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. शेतकरी,कामगार आणि कष्टकरी समाजाच्या विविध प्रश्नांवर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली व आगामी काळात या सर्व प्रश्नांवर राज्यव्यापी तीव्र आंदोलन करण्याचा व त्याची रूपरेषा विभागीय मेळाव्यात जाहीर करण्याचा निर्णय होऊन बैठकीचा समारोप करण्यात आला. बैठकीचे अध्यक्ष स्थान पक्षाचे वरिष्ठ नेते भाई प्रा. एस. व्ही. जाधव यांनी भूषविले.पक्षाचे सरचिटणीस माजी आमदार भाई जयंत पाटील,माजी आमदार भाई बाळाराम पाटील,पक्षाचे कार्यालयीन चिटणीस भाई ड. राजेंद्र कोरडे,पक्षाचे सहचिटणीस भाई बाबासाहेब देवकर, पक्षाचे खजिनदार आर्किटेक्ट अतुल म्हात्रे,पक्षाच्या पार्लमेंटरी बोर्डाचे सदस्य भाई प्रा.बाबुराव लगारे,पक्षाच्या दलित/अदिवासी/ भटके विमुक्त आघाडीचे अध्यक्ष भाई रामदास जराते, पक्षाच्या शिक्षक आघाडीचे अध्यक्ष भाई चंद्रकांत चव्हाण,पक्षाच्या महिला आघाडीच्या अध्यक्षा ड. मानसी म्हात्रे,पक्षाच्या रस्ते/महामार्गबाधित शेतकरी/ शेतमजूर आघाडीचे अध्यक्ष भाई दिगंबर कांबळे,भाई प्रा.शैलेंद्र मेहता,भाई विकास शिंदे,भाई मोहन गुंड,भाई ड.उदय गवारे, भाई ड.दत्ता भूतेकर,भाई गोकुळ पाटील आदींची ह्या चिटणीस मंडळ बैठकीला उपस्थिती होती.

# दोनशे महिलांना साडी वाटप करून अनाथ आश्रमात दिले भोजनदान

लातूर: विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त बहुजन समाज पार्टीच्या वतीने २०० गरजू महिलांना साडे वाटप व खुषी ग्राम अनाथ आश्रममध्ये भोजनदान करण्यात आले. पूज्य भंते महाथेरो पय्यानंदजी यांच्या शुभहस्ते साड्यांचे वाटप करण्यात आले. खुषी ग्राम अनाथ आश्रमामध्ये अन्नदान करण्यात आले. तसेच प्रत्येक जयंती मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचा डॉ. बा बासाहेब आंबेडकर यांची पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बहुजन समाज पक्षाचे जिल्हा प्रभारी डॉ प्रा. अनिल कांबळे, जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ सूर्यवंशी, ज्योतीराम लामतुरे, कोषाध्यक्ष बामसेफचे सूर्यकांत कालेकर, बाळाराम मुंडे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रमेश ओहळ, मिलिंद धावारे, राजकुमार मरे, महेंद्र कांबळे,




भीम आर्मीचे मराठवाडा अध्यक्ष विनोद कोल्हे, ब्लू पँथर अध्यक्ष साधूभाऊ गायकवाड, भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष विलास चक्रे, आतिश मांजरे, सागर साखरे, करण ओहाळ, सुरेश आण्णा वाघमारे, ऍड. संघमित्रा ओव्हाळ, कलावती डूमने, प्रतीक्षा सूर्यवंशी, नरसिंग बोडके बाबुराव गोडबोले, सूर्यभान राऊत, गौतम सोनकांबळे आदींची उपस्थिती होती.

# महाराष्ट्राची हास्य जत्रा सुपरस्टार, जयभीम पॅन्थर सिनेमाचे



सुपरस्टार : गौरव मोरे यांचे सानपाडा येथील सिनेमा थिएटरमधे आले असता त्यांचे जंगी स्वागत करताना समाज सेवक : शरद (भाऊ) सरोदे, नेरूळ जयंती उत्सव समिती – प्रदिप कांबळे आणि स्वाभिमानी भिम सैनिक : कल्याणराव एच. हनवते यांचे क्षण चित्र

# डॉ.राऊत दाम्पत्यांचा केज तालुका माजी सैनिकांच्या वतीने सत्कार

केज/प्रतिनिधी केज शहरातील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ.दिनकर राऊत व स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.हेमा राऊत यांचा केज तालुका संघर्ष माजी सैनिक संघटनेच्या वतीने विशेष सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. डॉ.दिनकर राऊत व डॉ.संध्या राऊत यांच्या दवाखान्यात माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबियाना उपचार करताना विशेष काळजी घेऊन फिस व इतर तपासणी आणि उपचार शुल्कातही मोठी सूट व सवलत दिली जाते. सैनिक देशासाठी सीमेवर मोठे कार्य करतात अशा वेळी त्यांच्यासाठी आम्ही जराशी मदत केली तर त्यात आम्ही एवढे काय करतो असे डॉ.संध्या राऊत म्हणतात. तर भविष्यात सैनिक व त्यांच्या परिवारासाठी आमचे हॉस्पिटल त्यांची जमेल ती सेवा करत राहणार असल्याचे



डॉ. दिनकर राऊत म्हणाले. डॉ. दिनकर राऊत यांचा विशेष शोध निबंध आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये प्रसिद्ध झाल्याबद्दलही सैनिकांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी माजी सैनिक संघटनेचे केज तालुका अध्यक्ष अजिमोद्दीन शेख, सचिव हनुमंत भोसले, उपाध्यक्ष राम प्रभू राऊत, मस्के,नारायण शिंदे, अनिल सपाटे,शेख इलाही यांच्यासह इतर माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज येथे बसडेपोसाठी २२ एप्रिल रोजी केविसंसचे धरणे व उपोषण

केज/प्रतिनिधी केज शहर खामगाव–पंढरपूर व अहमदपूर–अहमदनगर या दोन प्रमुख महामार्गाच्या जोडणीवर असल्याने येथून दररोज हजारो प्रवासी महाराष्ट्राच्या कानाकोऱ्यात ये–जा करत असतात. किल्लेधारूर चे बसआगार केजसाठी सोयीचे नाही. तसेच येथून दूर पल्याच्या गाड्या केज येथून सुटणे गरजेचं आहे. यासाठीच केज येथे राज्यपरिवहन मंडळाचे 'बसआगार' सुरू करावे या मागणीसाठी केज विकास संघर्ष समिती गेली पंधरा वर्षांपासून पाठपुरावा करत आहे. यासाठी समितीने सतत लेखी निवेदने व तोंडी विनंती करूनही अद्याप कार्यवाही झालेली नाही. यासाठी पुन्हा एकदा येत्या मंगळवार दिनांक २२ एप्रिल२०२५ रोजी सकाळी ११–०० वाजता केज तहसील कार्यालयासमोर धरणे व उपोषण आंदोलन सुरू करणार आहे. केज येथे बसआगारासाठी ७ एक्कर हुन अधिक जागा केज –बीड महामार्गालगत आरक्षित आहे. मात्र राज्यपरिवहन मंडळाच्या हलगर्जीपणा




मुळे ही जागा सध्या पडून आहे. हळू हळू ही जागा आता अतिक्रमण धारकांच्या विळख्यात जाऊ शकते. यासाठी या जागेवर 'बसआगार' स्थापित करावे तसेच आता इलेक्ट्रिक बसगाड्यांची वाढती संख्या पाहता याच जागेत अशा बसगाड्या इलेक्ट्रिक चार्जिंग सेंटर सुरू करण्याची मागणी समितीने केली आहे. किमान आतातरी शासनाने वरिष्ठ पातळीवर केजच्या बसडेपो स्थापित करून येथे मोठे इलेक्ट्रिक बसगाड्या चार्जिंग सेंटर सुरू करावी अशी समितीने मागणी समितीने केली आहे. या आंदोलनात केजवासीयांची मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी केले आहे. या निवेदनावर समन्वयक हनुमंत भोसले, शेषराव घोरपडे, नासेर मुंडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाच्या प्रती महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री प्रतापराव सरनाईक, आमदार नमिता ताई मुंदडा, उप महाव्यवस्थापक संभाजीनगर, विभागीय नियंत्रक बीड, आगार प्रमुख किल्लेधारूर यांना पाठवण्यात आलेल्या आहेत.

# चिंचोली माळी येथे मोठ्या उत्साहात संत नामदेव महाराज यात्रा संपन्न

केज /प्रतिनिधी केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे मोठ्या उत्साहात संत नामदेव महाराज यात्रा संपन्न झाली. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, चिंचोली माळी येथील ग्रामदैवत संत श्री नामदेव महाराज यांच्या जयंतीनिमित्त प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी चिंचोली माळी येथे गाडी ओढण्याचा कार्यक्रम पार पडला. मागील अनेक वर्षापासून ही परंपरा गावात चालू आहे यामध्ये मोठ्या भक्ती भावाने सात दिवस उपास करून दिनांक १९ २०२५ रोजी गाड्या ओढून नवस पूर्ण करण्याची परंपरा आहे. या कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील अनेक भाविक भक्त पूर्ण श्रद्धेने येथे उपस्थित असतात. हनुमान जयंती पासून प्रतिवर्षी हरिनाम सप्ताहाची सुरुवात होते. यामधे रोज संध्याकाळी कीर्तनाचा कार्यक्रम होतो व गावात खूप मोठे अन्नदान होते त्यानंतर गाड्या ओढण्याचा कार्यक्रम होऊन दुसऱ्या दिवशी काल्याचे किर्तन असते यावर्षी काल्याच्या कीर्तनासाठी ह.भ. प.उमेश महाराज दशरथे यांचे सुश्राव्य असे काल्याचे किर्तन होईल.



त्यानंतर जंगी कुस्त्यांचा सामना पार पडणार आहे यामध्ये पंचक्रोशीतील नावाजलेले पैलवान उपस्थित राहणार आहेत. यावर्षीही गावातर्फे सर्व पैलवानांना यामध्ये सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. संध्याकाळी संपूर्ण गावात छबिना पालखी मिरवणूक असते त्यामध्ये सर्व गावकरी,महिला पुरुष,तरुण सर्वजण सहभागी होऊन हा यात्रा महोत्सव अगदी आनंदामध्ये पार पडत असतो यामध्ये गावातील बरेच लोक बाहेरगावी कामानिमित्त नोकरीनिमित्त मुंबई–पुणे, संभाजीनगर अशा अनेक ठिकाणी राहत असलेले सर्व महिला,पुरुष,तरुण यानिमित्त गावात उपस्थित असतात. हा महोत्सव पार पडण्यासाठी गावातील सर्व ज्येष्ठ मंडळी पुढाकार घेऊन शांततेत महोत्सव पूर्ण करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करत असतात सर्व समाजाचे जाती–धर्माचे लोक एकत्रित येण्याचे हे एक उत्तम ठिकाण आहे.

# उलवे नोडमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी सलोखा आणि बौद्ध आंबेडकरी विचारांचा जागर..!

–नवी मुंबई / के. एच. हनवते :– दिनांक : १४ एप्रिल २०२५ रोजी उलवे नोडमधील एक प्रतिष्ठित व नोंदणीकृत संस्था बहुजन बौध्द बांधव सामाजिक संस्था यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती यंदाही अत्यंत जल्लोषात आणि अभिमानाने साजरी करण्यात आली. गेल्या सात वर्षांपासून सामाजिक व बौद्ध मूल्यांवर आधारित कार्य करणारी ही संस्था उलवे परिसरात सामाजिक एकतेचा दीप उजळवत आहे. सामाजिक उपक्रमांची प्रभावी झलक बहुजन बौध्द बांधव सामाजिक संस्था, उलवे नोड यांच्या सातव्या वर्षातील जयंती उत्सवाच्या निमित्ताने, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ब्लड डोनेशन कॅम्प (इश्रेव ऊेपरींळेप उराि) आणि (चशवळलरश्र उहशलज्ञीि) मेडिकल चेकप कॅम्प चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात दीपिशा फाउंडेशनच्या संचालिका डॉ. दिपाली गोडघाटे मॅडम आणि तेरणा हॉस्पिटल, नेरूळ यांच्या मोलाच्या सहकार्याबरोबरच, द मिलेनियम मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, उलवे आणि त्याचे संचालक डॉ. कपिल चावरे सर (एम डी) यांच्या विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या सामाजिक उपक्रमांचा लाभ उलवे पोलीस, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांनी घेतला. विचारांना उजाळा देणारा सांस्कृतिक कार्यक्रम कार्यक्रमाची सुरुवात जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष आयु. नितीन सोमनाथ आढाव यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर प्रा. बनसोडे यांच्या मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर बोलतोय या एकपात्री नाट्यप्रयोगाने उपस्थितांची मने जिंकली. शाळेतील विद्यार्थी याच्या भाषणानेही उपस्थितांचे विशेष कौतुक मिळवले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या भाषणांतून बाबासाहेबांच्या कार्याची झलक नव्या पिढीपर्यंत पोहोचली. भव्य मिरवणूक आणि सामूहिक स्नेहभोजन संध्याकाळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाच्या गजरात, निळ्या सजवलेल्या गाडीतून अभिवादन मिरवणूक निघाली. नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते संपूर्ण वातावरण प्रेरणादायी बनले होते मिरवणुकीनंतर सामूहिक स्नेहभोजन आयोजित करण्यात आले होते . कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन – समर्पित जयंती उत्सव समितीचे योगदान कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामागे खालील पदाधिकाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभले अध्यक्ष : नितीन सोमनाथ आढाव, सचिव : मिथुन भानुदास कांबळे, खजिनदार : मुकेश मधुकर मोरे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. रेखा



चिरनेरकर मॅडम यांनी अत्यंत प्रभावी पद्धतीने पार पाडले, तर शेवटी आयु. बापूराव जाधव साहेब यांनी मनोगत व आभार प्रदर्शन केले. विशेष आभार या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयु. कृष्णा केदारे साहेब, आयु. मिलिंद जाधव साहेब यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्याबद्दल संघटनेच्या वतीने विशेष आभार व्यक्त करण्यात आले. उलवे नोडमध्ये झालेला हा अभिमानास्पद उत्सव समाजात एकोपा, समता आणि बौद्ध विचारांची नवचैतन्य घेऊन आला. बाबासाहेबांचा आदर्श आणि प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्यात हा कार्यक्रम यशस्वी ठरला.

# अण्णाभाऊ साठेंना लोकशाहीर ही उपाधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिली - प्रबुद्ध साठे

मुंबई:– गिरणी कामगारांच्या प्रश्नांकरता अण्णाभाऊ साठे आणि मोरे हे निवेदन घेऊन राजगृहवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भेटण्यासाठी गेले असता नेहमीप्रमाणे बाबासाहेब लिखाण करीत बसले होते काहीवेळांने त्यांचे लक्ष प्रतीक्षा करीत असलेल्या साठे आणि मोरेंकडे गेले आणि बाबासाहेबांनी त्यांना नजरेनेच सूचना करीत बसण्यास सांगितले तेव्हा ते खुर्चीवर स्थानापन्न झाले त्यांनी लिखित निवेदनपत्र बाबासाहेबांच्या हाती सुपूर्द केले, निवेदन वाचून बाबासाहेबांनी त्यांना तिथेच गिरणी कामगारांच्या सर्वच प्रश्नांना मंजुरी देण्याचा शब्द देत कायदेशीर प्रक्रियेसाठी निवेदन पुढे पाठवून दिले, त्यावेळी मोरे यांनी अण्णाभाऊंची ओळख करून देताना बाबासाहेबांना सांगितलं की बाबासाहेब हे अण्णाभाऊ साठे त्यावेळी बाबासाहेब हसून म्हटले ही मी त्यांचं लिखाण वाचलं आहे त्यांचं लिखाण माझ्या परिचयाचे असून हे नुसते अण्णाभाऊ नाहीत तर ते खऱ्या अर्थाने लोकशाहीर आहेत व त्यावेळीच त्यांना बाबासाहेबांनी अण्णाभाऊना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या उपधीने अलंकृत केले असे प्रतिपादन प्रबुद्ध साठे यांनी अण्णाभाऊ साठे नगर शिवडी येथे बौद्धजन पंचायत समितीच्या वतीने आयोजित भीम महोत्सव – २०२५ या कार्यक्रमात प्रमुख वक्ता या नात्याने बोलत असताना केले. बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ५७८, माता रमाई महिला मंडळ, पंचशील मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३४ वा जयंती महोत्सव अर्थात भीम महोत्सव – २०२५ शाखाध्यक्ष श्रीधर मोरे यांच्या अधिपत्याखाली अण्णाभाऊ साठे नगर, गृहनिर्माण हौसिंग सोसायटी, मुंबई – १४ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी १३ एप्रिल २०२५ रोजी बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून ज्योत प्रज्वलित करून कार्यक्रमास प्रारंभ झाला, पहिल्या सत्रात मुलांकरता धावण्याची स्पर्धा तर दुसऱ्या सत्रात मुलांकरता चित्रकला स्पर्धा तर रात्री तिसऱ्या सत्रात मुलांचा नृत्य कलाविष्कार स्पर्धा हे कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाले, धावण्याच्या स्पर्धेचे परीक्षक हर्ष सिंग तर चित्रकला स्पर्धेचे परीक्षक विशाल गमरे, नितेश मोरे, सागर मोहिते तर नृत्य कलाविष्कार स्पर्धेचे परीक्षक विशाल कांबळे होते सर्व परीक्षकांनी पारदर्शक पद्धतीने परीक्षण केले, मध्यरात्री १२ वाजता फटाक्यांच्या आतिषबाजीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्माचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. दि. १४ एप्रिल २०२५ रोजी जैतवन बुद्ध विहार याठिकाणी महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून ज्योत प्रज्वलित करून मानवंदना देण्यात आली तद्नंतर योगिता उल्हास मोरे, अनंत गोविंद मोहिते, राजाभाऊ तथा रामदास धोंडू गमरे यांनी धार्मिक पूजापाठ सुमधुर वाणीने पार पाडला, त्यानंतर अनेक वक्त्यांनी आपले विचार व्यक्त केले, सर्व वसाहतीमधील नागरिकांना वैद्यकीय तपासणी साठी मोफत वैद्यकीय शिबीराचे आयोजन करण्यात आले सदर शिबीराचे उद्घाटन माजी कार्यसम्राट नगरसेवक सुनील मोरे, अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान संस्थेचे संस्थापक वंजारी साहेब, मुंबई अध्यक्ष संदीप मोहिते या तिघांच्या शुभहस्ते करण्यात आले सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० यावेळेत



अनेक रहिवाश्यांनी आवर्जून हजेरी लावून सदर शिबिराचा लाभ घेतला, शिवडी गटक्रमांक १३ च्या वतीने निघणाऱ्या भव्यदिव्य मिरवणुकीत सर्वांनी सहभागी होऊन मिरवणुकीचे मोठ्या जल्लोषात स्वागत केले. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताला संविधान दिले त्या घटनेस ७५ वर्षे पूर्ण झाली तेव्हा अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त भव्यदिव्य संविधान प्रतिकृती बनवली होती त्याचे उद्घाटन माजी नगरसेवक सुनील मोरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. दि. १५ एप्रिल २०२५ रोजी महिलांसाठी पैठणीचा खेळ हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. दि. १६ एप्रिल २०२५ रोजी संपूर्ण खेळांच्या बक्षीस वितरण व प्रमुख वक्ते प्रबुद्ध साठे यांच व्याख्यान आयोजित करण्यात आले होते सदर व्याख्यान सुरू असताना कार्यसम्राट आमदार कालिदास कोळंबकर साहेब आले त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. आपल्या व्याख्यानात प्रबुद्ध साठे पुढे म्हणाले की मातंग, चर्मकार आणि बौद्ध हे तीन भाऊ एकत्र आले आणि एक समाज निर्माण झाला तर विकासाची कवाडे आपोआप खुली होतील आणि बाबासाहेबांचे विचार खऱ्या अर्थाने गतिमान करण्यासाठी आपला हातभार लागेल, बाबासाहेबांनी मातंग समाजसाठी अनेक परिषदा घेतल्या आणि अण्णाभाऊंनी ही बाबासाहेब आंबेडकरांना आपला गुरू मानून त्यांचे विचार आत्मसात करून आपल्या लेखणीतून त्यांनी बाबासाहेब व बाबासाहेबांचे विचार मांडले, त्यांनी लिहिलेली फकिरा ही कादंबरी ही त्यांनी बाबासाहेबांना समर्पित केली आहे, आज बाबासाहेबांना अनुसरून बौद्ध समाज सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात पुढे आहे, मातंग समाज आज ही अंधश्रद्धा रूढी–परंपरा यात अडकलेला आहे म्हणून अण्णाभाऊंचा आदर्श घेत जर बाबासाहेबांच्या पावलावर पाऊल टाकून समाज चालला तर जास्तीत जास्त लेखक, विचारवंत समाजातून घडू शकतात असे विचार व्यक्त केले. सदर प्रसंगी बौद्धजन पंचायत समितीचे गटक्रमांक १३ चे व अक्षरा सामाजिक प्रतिष्ठानचे सरचिटणीस मोहिते, मातंग युवा संघटनेचे शिंदे, लोकरे, बाळ अडसूळे यांनीही आपले विचार व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश जाधव व उपेंद्र लोखंडे यांनी केले तर प्रस्ताविक राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे यांनी सादर केले. सदर प्रसंगी विजेत्यांना ट्रॉफी, सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. चार दिवसीय भीम महोत्सव – २०२५ भूतो न भविष्यती असा संपन्न झाला, सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी पंचशील मंडळाच्या तरुण कार्यकर्ते, महिला मंडळ यांनी तसेच अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानून सरचिटणीस अनंत मोहिते यांनी भीम महोत्सव – २०२५ या चार दिवसीय कार्यक्रमाची सांगता केली.

# चोरीचे ट्रॅक्टर ट्रॉली व एक मोटर सायकलसह दोन आरोपी अटक. ०२ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी.

लातूर :– चोरीचे ट्रॅक्टर ट्रॉली व एक मोटर सायकलसह दोन आरोपी अटक. ०२ गुन्हे उघड. स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी.

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला दाखल गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता. त्या अनुषंगाने पथक माहितीचे संकलन करीत असताना, माहिती घेत असताना दिनांक १७/०४/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला माहिती मिळाली की, पोलीस ठाणे वाढवणा तसेच औसा हद्दीतून चोरलेल्या ट्रॅक्टर हेड व ट्रॉली ची व ते चोरणाऱ्या आरोपीची खात्रीशीर बातमी मिळाल्याने दिनांक १७/०४/२०२५ रोजी सदर पथक तात्काळ लातूर शहरातील छत्रपती चौकात जाऊन माहिती मधील आरोपी नामे

रामदास बाबुराव जाधव, वय २७ वर्ष, राहणार कांबळगा तालुका शिरूर अनंतपाळ, जिल्हा लातूर,



विठ्ठल लक्ष्मण शेळके, वय १९ वर्ष, राहणार समता नगर, उदगीर. यांना ताब्यात घेऊन ट्रॅक्टर हेड व ट्रॅक्टर ट्रॉली बाबत विचारपूस केली असता त्यांनी सांगितले कि, ते दोघे व त्यांच्यासोबत आणखीन एक साथीदार ३) योगेश राजेंद्र किरवले, राहणार येळी, तालुका औसा (फरार) असे मिळून फवारणी मशीन बसवलेले ट्रॅक्टर चे हेड पोलीस ठाणे वाढवणा येथून तर पोलीस ठाणे औसा येथून ट्रॅक्टर ट्रॉली चोरून तावरज खेडा जिल्हा धाराशिव येथे एका शेतकऱ्याच्या आखाड्यावर ठेवलेले आहे असे सांगितले तसेच त्यांच्याकडील बुलेट मोटरसायकल फरार आरोपी किरवले यांनी कोठून तरी चोरून आणल्याचे सांगितले. त्यावरून नमूद दोन आरोपीकडून त्यांनी चोरलेल्या ट्रॅक्टर हेड व ट्रॉली तसेच एक बुलेट मोटरसायकल ज्याची किंमत ०५ लाख ४५ हजार रुपये असा असून ते जप्त करण्यात आले आहे.

नमूद आरोपींना पोलीस ठाणे वाढवणा येथे पुढील कार्यवाहीस्तव ताब्यात देण्यात आले असून संबंधित पोलीस ठाणेचे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे यांच्या नेतृत्वातील पथका मधील पोलीस अंमलदार माधव बिलापट्टे, नवनाथ हासबे, तुराब पठाण, राजेश कंचे, मोहन सुरवसे, नकुल पाटील यांनी पार पाडली.

## फुले आंबेडकर जयंती निमित्त : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने शतकोत्तर १०५ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन.




छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :– आपण सर्वांनाच ज्ञात आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २० एप्रिल १९५४ ला म्हटले होते की, निवडणूकीद्वारे जागा मिळविणे हे एक साधन आहे, साध्य नव्हे! तसेच २० एप्रिल १९३८ ला म्हटले होते की, तुमची मते विकू नका, ती सत्कार्यी लावा. त्या दोन्ही विधानाच्या अनुक्रमे ७१ व्या व ८७ व्या वर्धापनदिनानिमित्त विषय : निवडणूकीद्वारे जागा मिळविणे हे एक साधन आहे, साध्य नव्हे! म्हणून तुमची मते विकू नका, ती सत्कार्यी लावा. या विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने १०५ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे दिनांक २० एप्रिल २०२५, रविवारला दुपारी २:३० वाजता आयोजन करण्यात आले आहे. तरी आपण सर्व मानवतावादी व्यक्तींनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जणसंपर्क कार्यालय : प्लॉट क्रमांक : ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. येथे उपस्थित राहावे. या कार्यशाळेला संविधान लोकशिक्षण अभियानाचे संचालक : एड. विजय जाधव हे उद्घाटनपर मार्गदर्शन करणार आहेत. तर सामाजिक कार्यकर्ते सुभाष ठोकळ हे विशेष मार्गदर्शन करणार असून सामाजिक कार्यकर्ते अरविंद कांबळे हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. सर्व उपस्थित प्रतिनिधींना या कार्यशाळेत आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. तरी सर्व मानवतावादी नागरिकांनी फुले आंबेडकर जयंती निमित्त आयोजित या कार्यशाळेला उपस्थित राहून आपले म्हणणे उपस्थितांना समजावून सांगावे, पटवून द्यावे आणि इतरांचे म्हणणे समजून घ्यावे. करिता १०५ व्या शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# अजित पर्व युवा जोडो अभियान अंतर्गत लातूरमध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा युवक मेळावा उत्साहात संपन्न

लातूर/ प्रतिनिधी :– महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने आयोजित अजित पर्व युवा जोडो अभियान अंतर्गत लातूर शहरात भव्य युवक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यास युवकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमात युवकांशी थेट संवाद साधत युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी पक्षवाढीसाठी महत्त्वपूर्ण उपाययोजनांवर सखोल मार्गदर्शन केले या कार्यक्रमाला माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे, आमदार विक्रम बप्पा काळे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तसेच शहराध्यक्ष मकरंद भैय्या सावे, नांदेड शहराध्यक्ष जीवनजी घोगरे, प्रदेश सरचिटणीस ड. व्यंकटजी बेंद्रे, लातूर शहर कार्याध्यक्ष प्रशांत पाटील, युवक शहराध्यक्ष लाला सुरवसे, युवक प्रदेश उपाध्यक्ष इर्शाद सय्यद, युवक प्रदेश सरचिटणीस अमर



पाटील, तसेच पक्षाचे अन्य पदाधिकारी विशाल आवाडे, अभिजित सगरे, प्रवीण पाटील आदींची उपस्थिती लाभली. मेळाव्यात युवकांनी पक्षाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, त्यांची क्षमता आणि नेतृत्वगुण विकासित करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन नेत्यांनी केले. युवकांनी सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात सक्रीय योगदान द्यावे यावर भर देण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून नव्या युवकांची पक्षाशी बांधिलकी वाढवणे, त्यांना संघटनेशी जोडणे व पक्षाच्या कार्यामध्ये सहभागी करून घेणे हे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लातूर शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली. युवकांमधील सकारात्मक ऊर्जा आणि पक्षवाढीचा निर्धार यामुळे हा मेळावा विशेष यशस्वी ठरला.

# माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा मुलींमध्ये लातूर तर मुलांमध्ये पुणे विजेता पारितोषिक वितरण सोहळा थाटात

लातूर / प्रतिनिधी :– माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त येथील जिल्हा क्री–डा संकुलावर आयोजित राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत शुक्रवारी रात्री मुलींमध्ये लातूरविरुद्ध नागपूर या संघांत झालेल्या अंतिम सामन्यात लातूरच्या संघाने नागपूरच्या संघावर ३–२ ने विजय मिळवला तर मुलांमध्ये नागपूरविरुद्ध पुणे संघांत झालेल्या अंतिम सामन्यात पुण्याच्या संघाने नागपूरच्या संघाचा ३–१ ने पराभव केला. अत्यंत दिमाखदार कार्यक्रमात राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार विक्रम काळे, माजी आमदार धिरज देशमुख यांच्या हस्ते पारितोषिक वैयक्तिक पारितोषिकाचे हे ठरले मानकरी य मुले– बेस्ट अटॅकर– आसिफ बनवा (नागपूर), बेस्ट सेटर– मनोज कॉमळे (पुणे), बेस्ट युनिव्हर्सल – क्रिश कुमार (मुंबई उपनगर), बेस्ट लिबिरो–अलोक तोडकर (लातूर) य मुलींमध्ये – बेस्ट ॲटॅकर – जयश्री ठाकरे (नागपूर), बेस्ट सेटर– अनन्या सिंग (लातूर), बेस्ट युनिव्हर्सल–मृणाल आगरकर (पुणे), बेस्ट लिबिरो – पियाली धार (लातूर) वितरण करण्यात आले. गेली तीन दिवस जिल्हा क्रीडा संकुलावर व्हॉलीबॉलचे राज्यस्तरीय सामने सुरु होते. या स्पर्धेत मुलांचे आठ तर मुलींचे आठ असे एकूण १६ संघ राज्यभरातून सहभागी झाले होते. मुलींमध्ये लातूरविरुद्ध नागपूर यांच्यात अंतिम सामना झाला. अत्यंत चुरशीच्या या सामन्यात लातूरच्या मुलींनी चांगला खेळ करुन विजेतेपद पटकावले. लातूरच्या संघास ७५ हजार रुपये, ट्रॉफी देण्यात आली. उपविजेता नागपूरच्या संघास ५१ हजार रुपये ट्रॉफी देण्यात आली. मुलांमध्ये नागपूरविरुद्ध पुणे यांच्यात अंतिम सामना झाला. हा सामना अत्यंत रंगतदार झाला. पुण्याच्या संघाने नागपूरच्या संघावर ३–१ ने विजय मिळवला. पुण्याच्या संघास ७५ हजार रुपये, ट्रॉफी तर नागपूरच्या संघास ५१ हजार रुपये व ट्रॉफी देण्यात आली. या स्पर्धेत मुलांमध्ये मुंबई उपनगर तर मुलींमध्ये पुणे हे दोन संघ






तृतीय क्रमांकावर राहिले. या दोन्ही संघांना ३१ हजार रुपये व ट्रॉफी देण्यात आली. यावेळी सामना निरीक्षक आसिफ मुल्ला व उत्कृष्ट समालोचक प्रसाद कुलकर्णी यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी पाहुण्यांचे स्वागत लातूर जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनचे अध्यक्ष मोईज शेख, रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, धनराज देशमुख, अनंत देशमुख यांनी केले. प्रारंभी विकासरत्न विलासराव देशमुख यांच्या प्रमितेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. केक कापून माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE